६.३ शैक्षणिक अर्हता व अनुभव :

| पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|
| **१. लघुटंकलेखक** | १ माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>२ लघुलेखनाचा वेग किमान ८० शब्द प्रति मिनिट **आणि** इंग्लिश टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट **किंवा** मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट, या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र. |
| **२. लघुलेखक ( निम्न श्रेणी )** | १ माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>२ लघुलेखनाचा वेग किमान १०० शब्द प्रति मिनिट **आणि** इंग्लिश टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट **किंवा** मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट, या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र. |
| **३. लघुलेखक ( उच्च श्रेणी )** | १ माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>२ लघुलेखनाचा वेग किमान १२० शब्द प्रति मिनिट **आणि** इंग्लिश टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट **किंवा** मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट, या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र. |

७. **निवडप्रक्रिया :-**

७.१ जाहिरातीमध्ये नमूद अर्हता / पात्रते विषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

७.२ सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया खालील सेवा प्रवेश नियम अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा तसेच तरतुदीनुसार राबविण्यात येईल :-

(१) सामान्य प्रशासन विभाग, लघुटंकलेखक, लघुलेखक (उच्च श्रेणी/निम्न श्रेणी) ( सेवा प्रवेश नियम ), १९९७

८. **निवडीची पद्धत :-**

८.१.१ सर्व पदांसाठी फक्त मराठी माध्यमातून संगणक प्रणालीव्दारे ऑनलाईन परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात घेण्यात येईल. सदर परीक्षेमध्ये किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल.

८.१.२ संगणक आधारीत परीक्षेव्दारे (Computer Based Online Examination) घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुण व व्यावसायिक चाचणीमध्ये प्राप्त गुण अशा एकूण गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड केली जाईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. व्यावसायिक चाचणी घेण्याबाबतचे स्थळ, दिनांक व वेळापत्रक कृषी विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल.

८.१.३ संगणक आधारीत (Computer Based examination) घेण्यात येणारी ऑनलाईन परीक्षा ६० प्रश्नांची व १२० गुणांची असेल. त्यासाठी ७५ मिनिटांचा कालावधी राहील.

८.१.४ संगणक आधारीत ऑनलाईन परीक्षेसाठी अभ्यासक्रम खालीलप्रमाणे राहील:

| पदाचे नाव | तपशिल |
|---|---|
| **लघु टंकलेखक/ लघु लेखक (निम्न श्रेणी) / लघु लेखक (उच्च श्रेणी)** | १. या पदांसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दीक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ३० गुण ठेऊन एकूण ६० प्रश्नांची व १२० गुणांची परीक्षा घेण्यात येईल.<br>२. या पदांसाठी एकूण ८० गुणांची व्यावसायिक चाचणी स्वतंत्रपणे घेण्यात येईल.<br>३. प्रश्नपत्रिकेचा दर्जा माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १० वी) दर्जाच्या समान राहील.<br>४. लेखी परीक्षा व व्यावसायिक चाचणी या मधील एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल. |